मा. पो.उप.अ.
ला.लु.प्र.बीड

IO प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन, पाटोदा सत्यमेव जयते ता.पाटोदा जि.बीड

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** पाटोदा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0273 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/09/2025 03:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 01/09/2025

**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/09/2025

**Time From (वेळेपासून):** 19:55 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/09/2025 **Time (वेळ):** 03:39 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/09/2025 03:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बाबासाहेब अंबेडकर चौक,पोलीस स्टेशन समोर, पाटोदा ,पाटोदा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): असिफ मोबीन शेख

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : मोबीन

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2001

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | आधार कार्ड | 433020420974 |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खालापुरी,शिरुर,शिरूर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खालापुरी,शिरुर,शिरूर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शेतकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9075183882

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन अर्जुनराव तांदळे | | वडील का नाम : अर्जुनराव | 1. तुळजाई नगर,कपिलमुनी मंदीरासमोर,साई पंढरी लान्सचे पाठीमागे,बीड,बीड,शिवाजीनगर, बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20000 रुपये 500 रु. दराच्या | 20,000.00 |

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | 40 नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
20,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड
दिनांक - 02/09/2025.
मी आसिफ मोबीन शेख, वय-24 वर्ष, व्यवसाय-शेती/वाळु व्यवसाय, रा.खालापुरी ता.शिरुर जि.बीड मो.क्र. 9075183882 आधार कार्ड क्र.4330 2042 0974.
मी आज दि.01/09/2025 रोजी श्री.सोपान चिट्टमपल्ले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे समक्ष हजर येवुन तक्रार दिली की, " मी व माझा भागीदार (पार्टनर) श्री.तानाजी बन्सी वैद्य असे आम्ही दोघे मिळुन हायवाने पोलीस ठाणे पाटोदा जि.बीडचे हद्दीमध्ये वाळु वाहतुकीचा व्यवसाय करतो. सदर वाळु वाहतुक करण्यासाठी आमचे दोघामध्ये करारनामा केलेला आहे. सदर वाळु वाहतुक करणे करीता श्री.तानाजी वैद्य यांचे नावावर असलेल्या हायवा या वाहनाने पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड हद्दीत सदर हायवाव्दारे वाळु वाहतुक करण्यासाठी किंवा चालवण्यासाठी पोलीस ठाणे पाटोदा येथील पोलीस श्री.सचिन तांदळे साहेब हे 20000/- रुपये प्रति महिना प्रमाणे हप्त्यांची लाच मागणी करत आहेत." वगैरे मजकुराची तक्रार दिली.
माझे तक्रारीचे अनुषंगाने श्री.सोपान चिट्टमपल्ले, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.बीड यांनी कळवले की, मी पोलीस श्री.तांदळे साहेब यांची पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड येथे जावुन भेट घेणार असल्याने आपण पाटोदा जवळ असलेल्या येवलवाडी फाटा ता.पाटोदा जि.बीड येथे सुरक्षीत ठिकाणी जावुन कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावरुन मी माझ्याकडील मोटार सायकलने व श्री.सोपान चिट्टमपल्ले, पोशि/राठोड, पोशि/गवळी, पोशि/आघाव, चालक पोशि/पुरी व दोन पंच असे शासकीय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथुन रवाना होवुन 17.10 वा. चे सुमारास येवलवाडी फाटा ता.पाटोदा जि.बीड येथे पोहचलो. त्यानंतर श्री.चिट्टमपल्ले साहेब यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने दि.01/09/2025 रोजी श्री.सचिन तांदळे, पोलीस हवालदार, पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्र.1 श्री. सिरसठ यांना पोलीस श्री.तांदळे यांचेकडे पोलीस ठाणे पाटोद, जि.बीड येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर श्री.चिट्टमपल्ले यांनी मला व पंचांना एकंदरीत सापळा कारवाई कशी असते ? याबाबत सविस्तर माहिती दिली. श्री.चिट्टमपल्ले यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन पोशि/गवळी यांनी व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. श्री.चिट्टमपल्ले यांचे सुचनेवरुन पोशि/गवळी यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये स्वत:, दोन्ही पंच व माझे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर श्री.चिट्टमपल्ले यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र-1 श्री.सिरसाठयांना पोलीस श्री.सचिन तांदळे यांना भेटण्यासाठी माझ्याकडील मोटार सायकलने पोलीस ठाणे पाटोदा येथे रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.सिरसाठ असे माझ्याकडील मोटार सायकले पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड येथे गेलो. त्याठिकाणी माझी व पोलीस श्री.तांदळे साहेबाची भेट झाली. तेथे माझी व पोलीस श्री.तांदळे यांची माझे कामा संदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान पोलीस श्री.तांदळे साहेबांनी " वीस " असे म्हणुन माझ्याकडे वीस हजार रुपयाची लाचेची मागणी केली. त्यावेळी मी " वीस हजार रुपय देतो..हं, वीस हजार सध्या तरी येवढे थोड चालु होवूस तर फक्त " असे म्हणलो. त्यावेळी श्री.तांदळे यांनी " मी तर म्हणतोय तुम्हाला इथं कोणी बाकी आडवणार नाय" असे म्हणुन माझ्याकडे स्वत: करीता व साहेबा करीता असे म्हणुन

20,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य केले.
त्यानुसार श्री.चिट्टमपल्ले यांनी मला व दोन्ही पंचांना पोलीस श्री.तांदळे यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावरुन पोलीस श्री.तांदळे यांचे विरुद्ध सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. श्री.चिट्टमपल्ले यांनी वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले.
श्री.चिट्टमपल्ले यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. श्री.चिट्टमपल्ले यांनी माझे कडुन सापळा करवाईसाठी लागणारे 20,000/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या 40 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्र.-2 श्री.रोकडे यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास अँथ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. श्री.चिट्टमपल्ले यांनी मला पोलीस श्री.तांदळे साहेब यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेले 20000/-रुपये काढुन पोलीस श्री.तांदळे यांना द्याव्यात व डाव्या हाताने डोक्यावरील (मोलाना साद) टोपी काढुन डाव्या हातात धरणे असा इशारा नेमुन दिला.
त्यानंतर श्री.चिट्टमपल्ले यांचे सुचनेवरुन व्हाईस रेकॉर्डर सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.-1 श्री.सिरसाठयांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 20000/-रु. लाच रक्कम पोलीस श्री.तांदळे साहेब यांना देण्यासाठी पोलीस ठाणे पाटोदा, जि.बीड येथे रवाना केले. श्री.चिट्टमपल्ले हे पंच क्र.2 श्री.रोकडे व सापळा पथकासह शासकीय वाहनाने आमचे पाठोपाठ येत होते. मी व पंच क्र.1 श्री.सिरसाठ असे माझे कडील मोटार सायकलने पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड गेलो. तेथे गेल्यानंतर मी पोलीस श्री.तांदळे साहेब यांना फोन लावुन सांगीतले की, बाहेर उभाय असल्याचे सांगीतले. त्यानंतर काहीवेळाने पोलीस श्री.तांदळे हे पोलीस ठाणे पाटोदा चे समोर आले. त्यावेळी पोलीस श्री.तांदळे यांनी " काहीच बोलु नका, झालय का ऐवढ सांगा " त्यावेळी मी " झालय, वाळु धंद्याला काही अडचण नाही आली पाहिजे" असे म्हणुन माझे उजव्या हाताने पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 20000/-रुपये बाहेर काढून पोलीस श्री.तांदळे यांचे समोर धरली असता त्यांनी त्यांचे उजवे हाताने लाच रक्कम स्विकारुन " होय " असे म्हणुन अंगवार परिधान केलेल्या पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी मला लाच स्विकारल्या नंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 19.55 वा. केला. इशारा प्राप्त होताच श्री.चिट्टमपल्ले हे सापळा पथकासह आमचे जवळ आले. त्यावेळी पोलीस श्री.तांदळे यांना पोलीस ठाणे पाटोदाचे समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटोदा येथे सापळा पथकाने पकडले. त्यानंतर श्री.चिट्टमपल्ले यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार श्री.गवळी यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. श्री. चिट्टमपल्ले यांनी पोलीस श्री.तांदळे यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. श्री.चिट्टमपल्ले यांनी पंच क्र-1 श्री.सिरसाठ यांना विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.-1 श्री.सिरसाठ यांनी सांगितले की, "पोलीस श्री.तांदळे यांनी माझ्याकडे 20000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम 20000/-रु. पोलीस ठाणे पाटोदाचे समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, चौक पाटोदा येथे उजवे हाताने स्विकारुन अंगावरील परिधान केलेल्या पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली असा खुलासा पंच क्र.1 श्री.सिरसाठयांनी केला. त्यावेळी पोलीस श्री.तांदळे हे घाबरलेले होते.
त्यानंतर श्री.चिट्टमपल्ले यांनी पोलीस श्री.तांदळे यांना त्यांचे नाव, पद विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव सचिन अर्जुनराव तांदळे, वय-45 वर्ष, व्यवसाय-नौकरी, पोलीस हवालदार, ब.नं.772, नेमणुक पोलीस ठाणे पाटोदा जि. बीड रा.कपीलमुनी मंदिरा समोर, साई पंढरी लॉन्सचे पाठीमागे, तुळजाई नगर, बीड (वर्ग-3) असे सांगीतले. श्री. चिट्टमपल्ले यांनी पोलीस श्री.तांदळे यांना लाचरक्कमे बाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे अंगावरील परिधान केलेल्या पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सांगीतले. त्यानंतर श्री. चिट्टमपल्ले यांनी पंच क्र.2 श्री.रोकडे यांना लाच रक्कम ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावर पंच क्र.2 यांनी श्री.रोकडे यांनी लाचरक्कम ताब्यात घेतली व पंच क्र.1 श्री.सिरसाठ यांनी लाचेच्या नोटांचे वर्णन व क्रमांक नमुद असलेला कागदावरील नोटांचे क्रमांक पंच क्र.2 श्री.रोकडे यांना वाचुन दाखवले असता पंच क्र. 2 श्री.रोकडे यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे सांगुन लाच रक्कम 20000/-रु. असल्याचे सांगीतले. श्री.चिट्टमपल्ले यांनी सदरच्या नोटा पंच क्र.2 श्री.रोकडे यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले
त्यानंतर श्री.चिट्टमपल्ले यांनी प्राथमिक कारवाई पोलीस ठाणे पाटोदाचे समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर श्री.

चिट्टमपल्ले, मी, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, पोलीस श्री.तांदळे असे शासकीय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे आलोत.
तरी दि.01/09/2025 रोजी 17.21 वा. ते 19.55 वा.चे दरम्यान सचिन अर्जुनराव तांदळे, वय-45 वर्ष, व्यवसाय-नौकरी, पोलीस हवालदार, ब.नं.772, नेमणुक पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड रा.कपीलमुनी मंदिरा समोर, साई पंढरी लॉन्सचे पाठीमागे, तुळजाई नगर, बीड (वर्ग-3) यांनी माझ्याकडे माझे व माझे पार्टनर श्री.तानाजी वैद्य असे आम्हाला आमचेकडे असलेल्या हायवाने पोलीस ठाणे पाटोदा हद्दीमध्ये वाळु वाहतुक करू देण्यासाठी लोकसेवक श्री.तांदळे यांनी स्वत: करीता व साहेबा करीता असे म्हणुन प्रति महिना 20000/- रुपये हप्ता लाचेची मागणी करुन लाच रक्कम 20000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन दि.01/09/2025 रोजी 19.55 सुमारास डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटोदा येथे लाच रक्कम 20000/-रुपये पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता लोकसेवक श्री.तांदळे यांना लाचेच्या रकमेसह पकडले म्हणुन माझी पोलीस श्री.तांदळे यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
हि फिर्याद दिली ती माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मला वाचुन दाखवली ती बरोबर व खरी आहे.
समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
SOMNATH MADHUKAR JADHAO(I (Inspector)) / POBN77460 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)**

**Name (नाव):** SOMNATH MADHUK
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN77460